# “कर्म समर्पण”

**चाल :- क्या मीलीये ऐसे लोगो से जीनकी फितरत**

मानवतेला अंगीकारून, जन्माचा उद्धार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे, जीवनाचा श्रृंगार करू ।। धृ ।।

एकाला जाणु, एकाला मानु, एक बहुनी राहुया
सदाचाराची, सत्कर्माची, धुरा ही आपण वाहुया
अप-काराची भाषा नको, सदोदित परोपकार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे ।। १ ।।

थेंब थेब आपुल्या रुधीराचा, सत्कार्याशी लागावा
रक्ताच्या जीवन दानाने, अवघा समाज जागावा
व्यर्थ ना सांडो रक्त कुणाचे, मनोमनी विचार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे ।। २ ।।

धर्म जोडतो तोडत नाही, परी भाषा ही धर्माची
शिकवण देई सत्य अहिंसा, प्रेमा भक्ति कर्माची
माणूस बनूनी माणसाचा, आदरे सत्कार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे ।। ३ ।।

सत्यवचन हे गुरुमातेचे, मानूनिया स्विकार करू
सुखी होऊया जीवनामाजी, दुर दुःख विकार करू
स्वप्न हे सदगुरु रायाचे, आज चला साकार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे ।। ४ ।।

ज्ञान घेऊनी अज्ञानाच्या, त्या वाटेने जाऊ नका
“परशुरामा” या अंधारी, उगाच ठोकर खाऊ नका
गुरु समीप, “समर्पण” करूनी, स्वर्ग हा संसार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे ।। २ ।।